MO.9860898564
अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक – दिपक थोरात








बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष –०१ | अंक –२३० | रविवार दि.१२ मे २०२४ | आरएनआय –एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४
Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-01 | Issue -230 | SUNDAY DT. 12 MAY 2024 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

# बीड लोकसभेत देवेंद्र फडवणीस यांनी भाकरी फिरवण्याचे ऐवजी चुलीत पाणी ओतलं? पंकजा मुंडे समर्थकांकडून वावड्या?







- बीड लोकसभा मतदारसंघात लोकसभेत देवेंद्र फडणवीस यांची टीम सक्रिय असल्याचा भास–भाजप पदाधिकारी बीड पंकजाताई मुंडे समर्थकांमध्ये चर्चा सुरू

- देवेंद्र फडवणीस हे षडयंत्र कसणारा नेता म्हणून आम्ही देवेंद्र फडणीस ला मानत नाहीत बीड भाजपचे कोषाध्यक्ष चंद्रकांत फड व संघटन सरचिटणीस देविदास नागरगोजे यांचे म्हणणं आहे? की पंकजाताईला देवेंद्र फडवणीस आज सुद्धा लोकसभेमध्ये विरोध करत आहेत कारण फडवणीसांची बी टीम बीडमध्ये असल्याचा भास?

- देवेंद्र फडणवीस यांची बीड मधील टीम मध्ये अनेक दिग्गज नेते व युवा नेते कार्यकर्ते हे देवेंद्र फडणवीस यांनी पंकजाताईंचे विरोधात काम करण्यास सांगितल्याने अंधारातून तुतारीचा प्रचार करत असल्याचा आरोप यावेळी भाजप पदाधिकाऱ्यांकडून म्हणजेच पंकजाताई मुंडे समर्थकांकडून करण्यात येत आहे.




बीड /प्रतिनिधी

सध्याच्या महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये उलथापालक झाल्याच्या नंतर अजित पवार गट राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी एकनाथ शिंदे गट शिवसेना भाजप या तिहेरी सरकारची महाराष्ट्रामध्ये सरकार चालवत आहेत उद्धव ठाकरे यांना सत्तेवरून पायउतार व्हावे लागले कारण या मध्ये देवेंद्र फडवणीस यांनी सिंहाचा वाटा आहे की सरकार पाडून स्वतःच सरकार म्हणजेच भारतीय जनता पार्टी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गट शिंदे सेना या सर्वांना सोबत घेत त्यांनी तिहेरी सरकार चालू केला आहे परंतु याच सरकारमध्ये आज सुद्धा गटातटामध्ये लाभलेला भाजप हे महाराष्ट्रामध्ये एक शाप लागलेला आहे तो म्हणजे देवेंद्र फडणवीस असं बीड भाजपचे पदाधिकारी असलेले विद्यमान संघटन सरचिटणीस देविदास नागरगोजे व भाजपा कोषाध्यक्ष चंद्रकांत फळ यांनी सांगितले आहे यावेळी मात्र बीड लोकसभेमध्ये भारतीय जनता पार्टीच्या पंकजाताई मुंडे यांना बीड लोकसभेची उमेदवारी जाहीर झालेली आहे या लोकसभेच्या निवडणुकीच्या अनुषंगाने पंकजाताई मुंडे यांनी जिल्हा पिंजून काढलेला आहे परंतु याच आष्टी पाटोदा मतदार संघाचे आमदार राहिलेले व तीन जिल्ह्याचे आमदार असलेले आमदार सुरेश धस यांच्यावरती पंकजाताई मुंडे यांच्या समर्थकांचा विश्वास राहिलेला दिसून येत नाही यामध्ये देवेंद्र फडणवीस यांचे विश्वासू म्हणून आज सुरेश धस यांच्याकडे संशयाची सुई म्हणून पहात असलेले बीड जिल्हा भाजपचे पदाधिकारी यांनी सुरेश धस हे नक्कीच अंधारातून पंकजाताई मुंडे यांना विरोध करत राष्ट्रवादीचे बजरंग सोनवणे जेके मराठा समाजाच्या गळ्यातील ताईत बनले आहेत या बजरंग सोनवणे ला आमदार सुरेश असे मतदार करतील व आपल्या कार्यकर्त्यांना समर्थकांना अंधारातून तुतारी वाजवायला सांगतील अशी चर्चा बीड जिल्हा भाजपमध्ये म्हणजेच पंकजाताई मुंडे यांच्या समर्थकांमध्ये चर्चा सुरू आहे परंतु यावेळी सुरेश धस यांच्या विरोधात न बोलता ते थेट राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विरोधामध्ये व देवेंद्र फडणवीस पंकजाताई मुंडे यांना अंधारातून विरोध करून पाडण्याच्या तयारीत असल्याची चर्चाही आज रोजी जालना रोडवरील हॉटेल मध्ये भाजपाचे पदाधिकारी व भाजपा प्रचार कार्यालय जिल्हा बीड येथील काही पदाधिकारी यांच्या तोंडून ऐकायला मिळत आहे.

बीड जिल्ह्याच्या राजकारणामध्ये स्वर्गीय केशर काकू यांचा वसा चालविणारे बीडच्या पहिला महिला खासदार म्हणून ज्या अख्या महाराष्ट्रामध्ये प्रसिद्ध होत्या अशा केशर काकू यांचे चिरंजीव जयदत्त क्षीरसागर अनेक वर्षांपासून आज बीड जिल्ह्याच्या राजकारणासह महाराष्ट्रामध्ये एक वेगळ्या प्रकारची छाप असणारा नेता म्हणून श्री दत्त क्षीरसागर यांच्याकडे पाहिले जाते परंतु याच नेत्याने काही दिवसांपूर्वी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे शरद पवार यांना सोडून शिवसेनेचे साथ धरली होती शिवसेनेमध्ये गेल्यानंतर त्यांना मंत्री पद ही देण्यात आले फक्त परंतु जगतांना क्षीरसागर यांच्या बीड विधानसभेमध्ये त्यांचे पुतण्या संदीप क्षीरसागर यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गटाच्या वतीने निवडणूक लढवत असताना बीड विधानसभेमध्ये त्यांचा पराजय केला यावेळी मात्र पंकजाताई मुंडे यांच्या समर्थकांनी जयदत्त क्षीरसागर यांना विरोध केला होता हे मात्र नक्की आहे याचाच बदला घेण्यासाठी मला किंवा पंकजाताई मुंडे यांच्या विरोधात देवेंद्र फडणवीस यांचा क्षीरसागर हे तटस्थ राहण्याची भूमिका घेतलेली आहे सागर हे देवेंद्र फडणवीस यांच्या इशारा वरती चालत आहेत तर देवेंद्र फडणवीस पंकजाताई मुंडे यांना अंधारातून बीड विरोध करत आहेत जयदत्त क्षीरसागर हे देवेंद्र फडणवीस यांच्या शब्दाच्या पुढे न जाणारे नेते आहेत जयदत्त क्षीरसागर यांना देवेंद्र फडणवीस का सांगत नाहीत की पंकजाताई मुंडे महायुतीच्या उमेदवार आहेत आणि यांना तुम्ही सपोर्ट करा तुमची यंत्रणा जगतांना आपण पंकजाताई मुंडे यांना निवडून आणण्यासाठी फिरवा असा आदेश देवेंद्र फडणवीस का देत नसतील हे जग जाहीर आहे तर पंकजाताई मुंडे यांना विरोध म्हणून देवेंद्र फडणवीस जयदत्त क्षीरसागर सह ज्योतीताई मेटे आष्टी पाटोदा येथील माजी आमदार तथा तीन जिल्ह्याचे आमदार सुरेश धस गेवराई मतदार संघाचे लक्ष्मणांना पवार माजलगाव मतदार संघाचे भावी आमदार रमेश आडसकर शिवसंग्राम नेत्या ज्योती ताई मेटे यांना सांगितलं तर हे सर्वच मंडळी देवेंद्र फडणवीस च्या शब्दाच्या पुढे जाणार नाहीत परंतु देवेंद्र फडणवीस पंकजाताई मुंडे यांना पाण्यासाठी बीडमध्ये यंत्रणा सज्ज केलेली आहे याचवेळी ही वरील सर्व मंडळीची टीम ही तुतारीचा प्रचार करीत असल्याचा आरोप यावेळी बीड जिल्हा भाजप कार्यालयामध्ये सक्रिय असलेले संघटन सरचिटणीस देविदास नागरगोजे चंद्रकांत फड यांनी केलेले आहे या सर्व देवेंद्र फडणवीस यांच्या विरोधामध्ये पंकजाताई मुंडे समर्थक आक्रमक होण्याची दाट शक्यता आहे कारण देवेंद्र फडणवीस यांनी बीडला पंकजाताई मुंडे यांच्या सभेला का बोलावलं नाही असाही राग यावेळी देवेंद्र फडणवीस यांच्या मनामध्ये असल्याची चर्चा आहे कारण यावेळी आम्ही चहा व देवेंद्र फडणवीस यांना बीड जिल्ह्यामध्ये नको म्हणून पंकजाताई मुंडे समर्थक यांनी पंकजाताईंकडे आग्रह धरल्याची ही काही दिवसापूर्वी पंकजाताई मुंडे यांच्या गुप्त बैठकीमध्ये ठरले होते हे चर्चा आता भाजपा जिल्हा प्रचार कार्यालयाच्या बाहेर पडत आहेत म्हणून जयदत्त क्षीरसागर हे पंकजाताई मुंडे यांचे विरोधात काम करत आहेत अंधारातून अशी चर्चा चालू झाली आहे

भारतीय जनता पार्टीचे सरकार असताना शिवसंग्राम चे नेते स्वर्गीय विनायक रावजी मेटे साहेब यांच्या शिवसंग्राम पक्षाची धुरा यांनी सांभाळत देवेंद्र फडणवीस यांच्या पाठीशी मराठा समाजाची मोठी ताकद उभा करण्याचे काम यावेळी स्वर्गीय विनायकरावजी मेटे साहेब यांनी केली आहे स्वर्गीय विनायकरावजी मेटे यांचे अपघाती निधनानंतर शिवसंग्रामची धुरा त्यांच्या पत्नी शांत संयमी व अभ्यासू नेतृत्व असलेल्या एक अधिकारी राहिलेल्या व अभ्यासू महाराष्ट्रातील महिला नेतृत्व म्हणून ज्योतीताई मुंडे यांच्याकडे पाहिलं जातं तर यावेळी ज्योतीताई मेटे यांनी बीड लोकसभेत पंकजाताई मुंडे यांना पाठिंबा न देत त्यांनी स्वतः तटस्थ राहण्याचा निर्णय घेतला त्या शरद पवार गटाकडून निवडणूक लढविण्यास इच्छुक होत्या परंतु शरद पवार गट राष्ट्रवादी यांनी त्यांची उमेदवारी नाकारली त्यानंतर त्यांनी शांत पद्धतीने विचार करत तटस्थ राहण्याचा निर्णय घेतला ज्योतीताई मेटे यांच्या निर्णयाचे स्वागत मराठा बांधवांनी केल्यानंतर ज्योतीताई मेटे यांचे सर्व समर्थांचे गेले अनेक दिवसापासून बजरंग सोनवणे यांच्या तुतारीचा प्रचार करत आहेत तर यावेळी अंधारातून मिळते यांनी ही शरद पवार गटाचे बजरंग सोनवणे यांना मराठा समाजाचा उमेदवार म्हणून आज पाठिंबा दिलेला आहे हा पाठिंबा अंधारातून ज्योतीताई मेटे यांनी दिला असला तरी त्या अंधारातूनच देवेंद्र फडणवीस यांच्या इशारा वरती चालत असल्याची चर्चा बीड जिल्हा भाजप कार्यालयातील काही पदाधिकाऱ्यांकडून जालना रोडवरील हॉटेलमध्ये होत असल्याची चर्चा जोर धरत आहे परंतु द्वितीताई मेटे यांना

- अमित शहा देवेंद्र फडवणीस ला बीडला लोकसभेच्या प्रचारासाठी आम्हीच येऊन दिलं नाही पंकजा मुंडे समर्थकांची जालना रोडवरील हॉटेलमध्ये चर्चा?
- जवळच्या लोकांकडून धोका होण्याची दाट शक्यता नाकारता येत नाही?
- बीड जिल्हा भाजप यंत्रांना ढासळली महायुतीचे उमेदवार साठी माहितीचे अनेक आमदार युवा नेते तालुका पदाधिकारी पंचायत समिती जिल्हा परिषद सदस्य यांनी वातावरण फिरवलं पंकजा मुंडे यांना उद्याचं मतदान कमी होण्याची दाट शक्यता? देवेंद्र फडणवीस यांची टीम म्हणजे जयदत्त क्षीरसागर ज्योतीताई मेटे ही फडणवीसांची बी टीम आहे अशा प्रकारच्या वावड्या कजा मुंडे यांच्या समर्थका च्या तोंडून ऐकायला मिळत आहेत?
- जयदत्त क्षीरसागर व ज्योतीताई मेटे यांची तटस्थ ची भूमिका ही त्यांचा प्रश्न आहे परंतु त्यांनी घेतलेला निर्णय हा पंकजा मुंडे समर्थक व भाजप पदाधिकाऱ्यांना मान्य नाही?
- पंकजाताई मुंडे यांच्या विरोधात देवेंद्र फडणवीस यांनी भाकरी फिरवणे ऐवजी जयदत्त क्षीरसागर ज्योतीताई मेटे सुरेश धस लक्ष्मण पवार रमेश आडसकर यांच्याकडून चुलीत पाणी ओतलं?
- ज्योतीताई मेटे व जयदत्त क्षीरसागर हे दोन लाख मतदान अंधारातून तुतारीला फिरू शकतात ते पण देवेंद्र फडणवीस यांच्या इशाऱ्या वरती पंकजाताई मुंडे यांचे कार्यकर्ते यांच्या तोंडून देवेंद्र फडणवीस यांच्या वरती आमचा विश्वास नाही अशी चर्चा निघू लागले आहेत?
- देवेंद्र फडणीस यांनी बीड लोकसभेत पंकजाताईंच्या विरोधात षडयंत्र रचलेले असून त्या षडयंत्रात जयदत्त क्षीरसागर ज्योतीताई मेटे सुरेश धस लक्ष्मण पवार रमेश आडसकर सहभागी?
- जर देवेंद्र फडणवीसानी आ जयदत्त क्षीरसागर ज्योतीताई मेटे यांना सांगितले तर ते काम शंभर टक्के काम असणार होते. पण देवेंद्र फडणवीस यांनी त्यांना सांगितले का नाही पंकजा मुंडे समर्थकांत मध्ये फडणवीस यांच्या विरोधात रोष कायमच? बीड लोकसभेत प्रचारदरम्यान अमित शहा देवेंद्र फडणवीस यांना आम्ही बीडला बोलावलं नाही कारण हे नेते आमच्या विरोधात आहेत पंकजाताई मुंडे यांच्या समर्थकांचा सूर?
- पंकजाताई मुंडे ह्या महाराष्ट्रात देशाच्या राजकारणात देवेंद्र फडवणीस यांना नको आहेत परंतु आम्ही देवेंद्र फडवणीस यांना मानत नाहीत पंकजा मुंडे कडून ऐकायला मिळत आहे?
- देवेंद्र फडणवीस यांनी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर शिवसंग्रामच्या नेत्या ज्योतीताई मेटे यांना तटस्थ राहण्यासाठी सांगितल्याची चर्चा पंकजाताई समर्थकांत जोरदार होत आहे माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर गेल्या अनेक वर्षांपासून पहिल्यांदाच या लोकसभेच्या निवडणुकीत तटस्थ राहिले
- बीडच्या राजकारणाचा इतिहासात पहिल्यांदाच मेटे शिरसागर मुळे बजरंग सोनवणे यांना फायदा होणार आहे एवढं मात्र नक्की आहे परंतु
- ज्योतीताई मेटे यांनी देवेंद्र फडणवीस यांच्या इशाऱ्यावर तटस्थ राहण्याचा निर्णय घेतल्याची चर्चा बीड जिल्हा भाजप पदाधिकारी करत आहेत?

जर देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की पंकजाताईंचं काम करा तर त्या शंभर टक्के करतील परंतु देवेंद्र फडणवीस का सांगत नाहीत तर देवेंद्र फडणवीस हे पंकजाताई मुंडे यांना विरोध करून पाडण्याच्या तयारीत असल्याची चर्चा बीड भाजपच्या पदाधिकारी यांच्याकडून ऐकायला मिळत आहे.

- गेल्या लोकसभेला नगरपरिषद ला विधानसभेला भाजपचे ५० बूथ वर पुलिंग एजंट व बूथ प्रमुख उपस्थित होते परंतु यावेळी भाजपच्या पदाधिकाऱ्यांकडून भूत एजंट व पुलिंग एजंट यांना साहित्य अजून वाटप झालेले नाही तर यावेळी बीड जिल्हा प्रचार कार्यालय भाजपच्या वतीने दलाल वृत्तीच्या कार्यकर्त्यांनी पंकजाताईंना पाडण्याचा ठरविल्याची चर्चाही संबंधित भूत प्रमुखांमध्ये होत आहे
- बीड जिल्ह्यामध्ये भाजपकडून बूथप्रमुखांचा अभाव?
- शक्ती केंद्रप्रमुख बुथ प्रमुख अजूनही वाऱ्यावरच भाजपची यंत्रणा कोसळली?
- पंकजाताई मुंडे यांना अजून सुद्धा छोट्या छोट्या जाती-धर्मातील कार्यकर्त्यांना नेत्यांना भेटण्यासाठी रोखला जाऊ लागला आहे

**बजरंग सोनवणे चे चे पारड जड भाजपचे लोकांनी आशा सोडून दिली**

भाजपच्या बूथ प्रमुख बीड या व्हाट्सअप ग्रुप मध्ये बजरंग सोनवणे यांच्या प्रचार सुरू बीड जिल्हा लोकसभा निवडणुकीसाठी भारतीय जनता पार्टीने बूथ प्रमुख बीड म्हणून बूथप्रमुखांचा प्रमुख ग्रुप केलेला आहे काही प्रमुखांनी बजरंग सोनवणे यांचे प्रचाराचे व्हिडिओ टाकून प्रचार केला यावरून भाजपची भाजपची भूत यंत्रणा ढासळली असं दिसून येत आहे.

माजलगाव मतदार संघातील विद्यमान आमदार प्रकाश सोळुंके यांनी आपली यंत्रणा कामाला लावलेली आहे परंतु प्रकाश सोळुंके यांचा आदेश त्यांचेच कार्यकर्ते सध्या पाळत नाहीत ते भजन सोनवणे यांची तुतारी वाजविण्याच्या तयारीत आहेत तर यावेळी भाजप नेते रमेश आडसकर हे तुतारीचा काम करत असल्याची चर्चा व त्यांचे समर्थक हे तुतारीलाच चालवा असं खालच्या कार्यकर्त्यांना सांगत आहेत अशी ही चर्चा यावेळी ऐकायला मिळत आहे तर मोहन जगताप हे मात्र सध्याच्या परिस्थितीमध्ये पंकजाताई मुंडे यांना मतदान करा असे आवाहन करत असतानाच त्यांचं त्यांचे कार्यकर्ते किती ऐकतात यावर अवलंबून आहे म्हणून माजलगाव मतदार संघातील अनेक गावांमध्ये धारूर वडवणी माजलगाव या ठिकाणी बजरंग सोनवणे ला साथ मिळणार असल्याची चर्चा जोर धरू लागली आहे

बीड लोकसभेमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गटाचे नेते अमरसिंह पंडित भाजपाचे आमदार लक्ष्मण पवार यांचे समर्थक ही तुतारीलाच मतदान करा असं ग्रामीण भागामध्ये सांगत आहेत अशीही चर्चा गेवराई मतदार संघामध्ये जोर धरू लागली आहे म्हणून बजरंग सोनवणे ते पार्टी गेवराई मतदार संघात जड समजले जात आहे तर गेवराई तालुक्यातील भाजपची यंत्रणाही ढासळण्याचे चित्र स्पष्ट होत आहे



ही घटना अवकाळी वादळी वारा पावसामुळे साडेपाचच्या सुमारास घडली आहे यात घराचे नुकसान व तसेच पाच जण जखमी झाले असून त्यांना दवाखान्यात पाठवले आहे

### उद्धव बाळासाहेब ठाकरे यांची शिवसेना बजरंग बप्पा सोबत असल्याने

# बप्पाचा विजय निश्चित.. शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर

बीड । प्रतिनिधी

लोकसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे उमेदवार, शेतकरी पुत्र बजरंग बप्पा सोनवणे यांच्या प्रचारार्थ राष्ट्रीय नेते तथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष-शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष खा.शरदचंद्रजी पवार साहेब यांची आज भव्य जाहीर सभा शहरातील छत्रपती संभाजी महाराज क्रिडांगण बीड येथे संपन्न झाली. यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर म्हणाले हि नीवडणुक फक्त उमेदवारांची नसुन केवळ एका पक्षाची नसुन तर तुमची आमची सर्वांची ही निवडणूक आहे आणि हि नीवडणुक ज्यांनी शेतकऱ्यांच्या विरोधात या देशांमध्ये महागाई वाढवली ज्यांनी या देशांमध्ये बेरोजगारी वाढवली ज्यांनी या देशाला एका हिटलर शाही कडे नेण्याचे काम केले अशा माणसाच्या विरोधातली ही निवडणूक आहे आणि या अशा प्रवृत्तीच्या व्यक्तीला भाजप आणि हिटलर शाही मोदीला जर नेस्तनाबूत करायचा असेल तर या निवडणुकीच्या माध्यमातून मातीत गाढायचे असेल तर निश्चित मानाने मतदान रुपी आशीर्वाद देऊन महाविकास आघाडीचे उमेदवार उमेदवार बजरंग बप्पा सोनवणे यांना आपल्याला मोठ्या मताधिक्याने निवडून द्यावे लागेल याच बरोबर आपण देशात बघितले असेल संपूर्ण हिंदुस्ताना मध्ये असो किंवा संपूर्ण जगामध्ये जर विचारलं सर्वात फेकू पंतप्रधान जर कोण असेल तर एकच नाव निघते दुनिया मध्ये लबाड आणि





खोटं बोलण्यात असेल तर आपल्या देशाचे प्रधानमंत्री या ठिकाणी खोटं बोलण्यात लबाड आहेत तुमच्या आमच्या सर्व जनतेची फसवणूक केली आम्ही निवडून आल्यानंतर लोकांच्या खात्यात १५ लाख देईल अशा पद्धतीने भाजपने आणि मोदींनी घोषणा केलेली होती लोकांचे अच्छे दिन येतील दोन करोड लोकांना नौकऱ्या दिल्या जातील अशा पद्धतीचे गाजर दाखवण्याचं काम या ठिकाणी या भाजप सरकारने केले परंतु जनता काय दुध खुळी नाही जनता विसरलेली नाही ही निवडणूक देशाचे संसदेची निवडणूक आहे ज्या पार्लमेंट मध्ये देशाचे कायदे तयार होतात कायदे बनवले जातात असी अस्तित्वाची लढाई आहे आणि अस्तित्वाची लढाई जिंकण्यासाठी आपण सर्व जनतेने हि निवडणूक हाती घेतलेली आहे व बीड जिल्ह्यातील परिस्थिती जर बघितली तर बीड जिल्ह्यामध्ये एका बाजूला धनशक्ती आहे तर दुसऱ्या बाजूला जनशक्ती आहे तुमच्यासारखा जनसमुदाय हा महाविकास आघाडी सोबत आहे आणि समोरचा उमेदवार हे धनशक्तीच्या जोरावर निवडणुकीला सामोरे जात आहेत.

विकास, महागाई, बाबतीत बोलल तर या देशाचा शेतकरी मेटाकुटीला आलेला आहे आपल्या बीड जिल्ह्यामध्ये असेल महाराष्ट्रात असेल सर्वाधिक जर शेतकरी आत्महत्या होत असतील तर त्या बीड जिल्ह्यामध्ये होतात मग हे कुणाचे पाप आहे यामुळे येणाऱ्या १३ तारखेला तुतारी वाजविणारा माणूस या चिन्हा समोरील ०२ नंबरच बटन दाबून बजरंग बाप्पा सोनवणे यांना प्रचंड मतांनी विजयी करावे. याप्रसंगी माजी गृहमंत्री अनिलजी देशमुख साहेब, माजी आरोग्य मंत्री राजेश जी टोपे साहेब, माजी मंत्री प्रा.सुरेश नवले साहेब, माजी मंत्री बदामराव आबा पंडीत,आमदार संदीप भैय्या क्षिरसागर,माजी आमदार सय्यद भाई सलीम, राष्ट्रवादी च्या ज्येष्ठ नेत्या सुशीला ताई मोराळे, राष्ट्रवादी युवक चे प्रदेश अध्यक्ष मेहबूब भाई शेख,शिवसेना जिल्हाप्रमुख गणेश भाऊ वरेकर, जिल्हाप्रमुख रत्नाकर आप्पा शिंदे,शहर प्रमुख शेख निजाम भाई, जिल्हा संघटक रतन तात्या गुजर, उपजिल्हाप्रमुख आजिनाथ खेडकर, उपजिल्हाप्रमुख राजूभाऊ महूवाले,तालुका प्रमुख गोरख आण्णा सिंघण, विधानसभा प्रमुख सुशील भैय्या पिंगळे,रवी आण्णा वाघमारे, विनोद गूंड पाटील,अजय गायकवाड, दिपक घोडके, व सर्व महाविकास आघाडीचे प्रमुख पदाधिकारी व मतदार बंधू मोठ्या संख्येने उपस्थित होते..!!

# ग्रामदैवत सालशिदबाबा यात्रा उत्सव उद्या दिनांक १२/०५/२०२४ वार रविवार यात्रेचे आयोजन

अहमदनगर(प्रशांत बाफना)

शेवगाव: तालुक्यातील ढोरजळगाव ने येथील पंचक्रोशीतील श्री ग्राम दैवतसालशीदबाबा यात्रा उत्सव उद्या दिनांक १२/०५/२०२४ वार रविवार ढोरजळगाव च्या पंचक्रोशीतील ग्रामदैवत सालाशिद बाबा यात्रा उत्साह निमित्त शेवगाव तालुक्यातील व पंचक्रोशीतील यात्रेनिमित्त येणाऱ्या भाविक भक्तांचे ढोरजळगाव ने ग्रामपंचायत व सोसायटीच्या सरपंच व त्यांचे इतर सदस्य सोसायटीचे चेअरमन व त्यांचे सर्व सदस्य व जळगाव नेचे ग्रामस्थ यांच्या वतीने येणाऱ्या भाविक भक्तांचे यात्रा कमिटी व त्यांचे सदस्य या सर्वांमते यात्रेनिमित्त येणाऱ्या भाविक भक्तांचे हार्दिक हार्दिक स्वागत ढोरजळगाव येथील ग्रामदैवतसावाशिद बाबा हे मूळ बीड सांगवी येथील ग्रामदैवत आहे. लेडीज सांगवी येथील यात्रा सात दिवस अगोदर होत असते. ढोरजळगाव येथील ग्रामदैवत बाबा भावनाशील डोंगरगाव येथील यात्रा अक्षय तृतीया नंतर जो पहिला रविवार येतो त्या दिवशी यात्रा उत्सव साजरी केला जातो. फार पूर्वीपासून हे ग्रामदैवत ढोरजळगाव येथे अस्तित्वात आलेले आहे. श्री महादेवाचा अवतार असणारे देवस्थान ढोरजळगाव येथील पंचक्रोशीत आहे. सालाबाद प्रमाणे यात्रेच्या आदल्या दिवशी म्हणजे शनिवारी कावडीचे नियोजन केले जाते. श्री शेत्र पैठण येथील गोदावरी नदीपात्रातून कावडीचे नियोजन करून देवाला ताज्या कावडीचे आयोजन केले जाते व ताजे पाण्याने रविवारी देवाला गंगा स्नानाने अंघोळ घातली जाते. जेव्हा रात्री बारा वाजता ताज्या पाण्याची नियोजन केले जाते त्याच वेळेस गंगेमध्ये कावडीला दर्शन दिले जाते त्यानंतर रात्री बारा ते सकाळी सात वाजेपर्यंत कावडी वाले पायी चालत येऊन कावडीचे पाणी बरोबर घेऊन देवाच्या गर्जना करतात व ते पाणी सकाळी ठीक नव्हते अकरा या वेळेत देवाला गंगा स्नान




घातल्या जाते व ब्राह्मणाच्या साक्षीने देवाचा अभिषेक घातला जातो त्यावेळेस पंचक्रोशीतील भाविक यात्रे करू या ठिकाणी सर्व कावडीचा आणि अभिषेकाचा आनंद घेत असतात त्यानंतर त्या ठिकाणी भव्य दिव्य अशी महाप्रसादाची पण तिचे आयोजन केले जाते. यात्रेनिमित्त येणाऱ्या सर्व भाविक भक्तांना महाप्रसादाचा आस्वाद देण्यात येतो त्यानंतर दिवसभर भजनाचा कार्यक्रम केला जातो. रात्री ठीक सात वाजता छबिण्याची मिरवणूक रात्री बारा वाजेपर्यंत चालत राहते व दुसऱ्या दिवशी सोमवार दिनांक १३ ५ २०२४ या दिवशी जंगी हंगामा ढोरजळगाव येथे नियोजन केले जाते व त्या ठिकाणी महाराष्ट्रातील व सर्व पंचक्रोशीतील पैलवानाचि मोठ्या प्रमाणात हजेरी असते तसेच महिला वर्गांचा यामध्ये समावेश असतो. या ठिकाणी जंगी हंगामा केला जातो ढोरजळगाव येथील ग्रामदैवत असलेले सावशीत बाबा यात्रा उत्सव दोन दिवस चालत असतो. जळगाव नेहा पंचक्रोशीतील यात्रा उत्सव साजरा केला जातो. दरवर्षी हे जागृत देवस्थान असल्यामुळे या ठिकाणी भव्य दिव्य यात्रा भरत असते. मंदिरावर भव्य दिव्य अशी दीपमाळ व लाईट डेकोरेशन केले जाते या देवस्थानाच्या ठिकाणी असलेला मंडप व लाईट डेकोरेशन चे डायरेक्टर श्री संतोष लक्ष्मण डोळस गावचे असणारे पोलीस पाटील यांचे सहकार्य यात्रा कमिटीला लाभत असते. या यात्रेसाठी येणाऱ्या यात्रा उत्सव २०२४ च्या यात्रेनिमित्त येणाऱ्या भाविक भक्तांचा हार्दिक हार्दिक हार्दिक ग्रामस्थांच्या वतीने स्वागत करण्यात येत आहे धन्यवाद

### देशाची लोकशाही बळकट आपल्या मताचा हक्क बाजवा मोठ्या संख्येने

# मतदारांनी मतदान करावे – ॲड शेख शफीक भाऊ

**बीड ।प्रतिनिधी**

**येत्या १३ मे २०२४ सोमवार रोजी मतदारांनी आपल्या मताचा उपयोग देशाची लोकशाही बळकट करण्यासाठी व लोकशाहीत मतदान हा आपला महत्त्वाचा हक्क, अधिकार आहे. त्यामुळे मिळालेल्या या अधिकाराचा वापर प्रत्येक भारतीय नागरिकाने प्राधान्याने करावा आणि मतदानाचे कर्तव्य पार पाडावे. आपल्या देशाने लोकशाही स्वीकारली,**

आपण ती अजूनही टिकवून ठेवली। आहे. लोकशाहीने अनेक सुविधा,अधिकार, हक्क आपल्याला मिळतात पुढे व लोकशाही बळकट



करण्याची संधी असते व आजच्या परिस्थितीत मध्ये देशाची लोकशाही मजबूत करण्यासाठी व डॉ बाबासाहेब आंबेडकर साहेबांनी दिलेल्या संविधान वाचविण्यासाठी मोठ्या संख्येने मतदान करावे असे आवाहन -खचखच् जिल्हा अध्यक्ष ड शेख शफीक भाऊ यांनी केले आहे

# खा. इम्तियाज जलील यांच्या प्रचाराची धुरा शफिक भाऊंनी लिलया पेलली

### निवडणुकीच्या धामधुमीत ही सर्वधर्म समभावाची खासियत जपली



औरंगाबाद / प्रतिनिधी

औरंगाबाद लोकसभा मतदारसंघातील एआयएमआयएम पक्षाचे उमेदवार खासदार इम्तियाज़ जलील यांच्या प्रचाराची धुरा पक्षाचे बीड जिल्हाध्यक्ष ड. शेख शफीक भाऊंनी गेल्या आठ दिवसांपासून लिलया पेलली शिवाय निवडणुकीच्या धामधुमीतही सर्वधर्म समभाव जपण्याची त्यांची हातोटी ही दाखवून दिली. यामुळे एआयएमआयएम पक्ष फक्त मुस्लिम समाजापुरता मर्यादित नसून सर्वसमावेशक दृष्टिकोन ठेवणारा असल्याचे पुन्हा एकदा अधोरेखित झाले. एआयएमआयएम पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा खासदार अल्हाज बॅरिस्टर असदुद्दीन ओवैसी यांच्या आदेशावरून पक्षाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष तथा औरंगाबाद चे खासदार इम्तियाज जलील, मराठवाडा प्रदेशाध्यक्ष डॉ. अब्दुल गफ्फार कादरी, मराठवाडा विभागाध्यक्ष फिरोज लाला यांच्यासह अन्य पदाधिकाऱ्यांसोबत गेल्या आठ दिवसांपासून शफिक भाऊ औरंगाबाद येथे खासदार इम्तियाज जलील यांच्या प्रचारार्थ गेलेले आहेत. तिथे ते एका कर्तव्यदक्ष व राजकारणात पदार्पणानंतर प्रथम पाच वर्षे आमदार व नंतर पाच वर्षे खासदार म्हणून दैदीप्यमान उल्लेखनीय कारकीर्द घडविणारे पक्षाचे प्रदेशाध्यक्ष खासदार इम्तियाज जलील यांना दुसऱ्यांदा संसदेत पाठवण्यासाठी जोमाने प्रचारसभा, कॉर्नर मीटिंग, वैयक्तिक गाठीभेटी करीत होते. आता प्रचाराच्या तोफा थंडावल्या असून इतर सहकाऱ्यांसह शफिक भाऊंनाही थोडी विश्रांती मिळणार आहे. दरम्यान औरंगाबाद मध्येही शफिक भाऊंनी त्यांच्या नेहमीच्या मनमिळाऊ स्वभावाने प्रत्येक जाती धर्मातील बांधवाला आपलेसे केले. यामुळे औरंगाबाद जिल्ह्यातील जनतेलाही शफिक भाऊ चांगलेच परिचयाचे झाले आहे.

### औरंगाबादच्या जनतेने एकमेव मुस्लिम खासदारास प्रचंड बहुमताने निवडून द्यावे – ॲड शेख शफिक भाऊ

संपूर्ण महाराष्ट्र राज्यातून एकमेव अधिकृत मुस्लिम उमेदवार म्हणून खासदार इम्तियाज जलील हे दुसऱ्यांदा एआयएमआयएम पक्षाकडून निवडणूक लढवीत आहेत. औरंगाबाद येथून चाळीस वर्षानंतर खासदार म्हणून निवडून येणारे इम्तियाज जलील हे एकमेव खासदार आहेत. गेल्या निवडणुकीमध्ये जसे जनतेने त्यांना भरभरून साथ व मते देऊन विजयी केले होते त्याचप्रमाणे यावेळीही येत्या १३ मे २०२४ सोमवार रोजी औरंगाबाद जिल्ह्यातील सर्व विकास प्रेमी जनतेने इम्तियाज जलील यांच्या पतंग या चिन्हा समोर मते देऊन प्रचंड बहुमताने विजयी करावे. असे आवाहनही ड. शेख शफिक भाऊ यांनी केले आहे.

# मतदान विषय जनजागृती कार्यक्रम संपन्न

बीड (प्रतिनिधी)

राजर्षी छत्रपती शाहू महाराज प्रतिष्ठानच्या वतीने बीड शहरातील घुले क्लासेस बीड या ठिकाणी युवा वर्गासाठी मतदान जनजागृती अभियान कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून मिथुन जोगदंड व ज्योतीराम घुले आधी उपस्थित होते.

यावेळी बोलताना कांबळे म्हणाले की ,मताधिकार हा प्रत्येक भारतीय नागरिकांना मिळालेला मूलभूत हक्क व अधिकार आहे परंतु आपले कर्तव्य म्हणून प्रत्येक नागरिकांनी मतदानाचा अधिकार बजावला पाहिजे आपली भारतीय लोकशाही ही मतदानाच्या स्वरूपातून आपले संसदेतील उत्तराधिकारी निवडतात आपले प्रतिनिधित्व हे संसदेचे खासदार करत असतात हे आपल्यासाठी संसदेमध्ये कायदे तयार करत असतात व ते कायदे संपूर्ण देशभर राबवले जातात व त्यातूनच आपल्या देशाचे व प्रत्येक नागरिकाचे हित जोपासले जाते आपल्यासाठी जे कायदे बनवतात त्या व्यक्तीला निवडण्याचा खूप मोठा अधिकार आपल्याला मतदानाच्या स्वरूपातून मिळालेला आहे तो आपण जर नाकारला तर आपण लोकशाहीसाठी मारक ठरू शकतो त्यामुळे मतदार यादीत नाव समाविष्ट असलेल्या प्रत्येक नागरिकांनी मतदान करणे खूप गरजेचे आहे असे आवाहन यावेळी राज्य युवा पुरस्कार्थी तत्त्वशील कांबळे यांनी केले.

यावेळी मिथुन जोगदंड यांनी आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाले की संविधानाने दिलेल्या अधिकाराचा आपण वापर करणे खूप गरजेचे आहे



चला लोकशाहीचा उत्सव साजरा करूया प्रत्येक जण मतदान करूया असे आवाहन त्यावेळी जोगदंड यांनी केले

घुले यावेळी बोलताना म्हणाले की आपले कर्तव्य कदापिही विसरून चालणार नाही आजचा युवा हा आपल्या देशाचा कणा आहे वतनिया लोकशाहीच्या उत्सवात १००% सहभागी होणे गरजेचे आहे मतदार राजा जागा हो लोकशाहीचा धागा हो या उप्तीप्रमाणे प्रत्येकाने आपले मत अधिकाराचा वापर करावा व आपल्या लोकशाही उत्सवात प्रशासनाला ही सहकार्य करावे.

# विकासाचे व्हिजन असलेल्या पंकजाताई मुंडे यांना पाठिंबा



किल्लेधारुर (प्रतिनिधी)

विकास हेच आपले व्हिजन असून त्यासाठी बीड लोकसभेच्या महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांना जी. के. फाऊंडेशनचा पाठिंबा आहे. विकास या मुद्द्यावर पंकजाताई मुंडे यांना लोकसभेत पाठवा, असे आवाहन सामाजिक क्षेत्रात अग्रेसर असलेले जी. के. फाऊंडेशनचे अध्यक्ष गोविंद भैय्या केकान यांनी येथे पत्रकार परिषदेत केली.

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आपली राजकीय भूमिका मांडण्यासाठी शनिवार, ११ मे रोजी दुपारी ३ वाजता पत्रकार परिषद घेतली. या पत्रकार परिषदेला जी. के. फाऊंडेशनचे सचिव दीपक सांगळे, सामाजिक कार्यकर्ते अनिल डापकर, उपसरपंच धर्मराज सांगळे आदींची उपस्थिती होती. पत्रकार परिषदेत बोलताना गोविंद भैय्या केकान म्हणाले, सध्याची निवडणूक विकासाच्या मुद्द्यावर होण्याची गरज आहे. बीड लोकसभा निवडणुकीत विकासाचे व्हिजन असलेल्या लोकनेते गोपीनाथ मुंडे यांच्या कन्या, माजी मंत्री पंकजाताई गोपीनाथ मुंडे यांचे हात बळकट करण्याची गरज असून या निवडणुकीत विकासाचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी महायुतीला पाठींबा दिला आहे, असेही गोविंद भैय्या केकान यांनी सांगितले.

# कर्तृत्वान लेकीच्या विक्रमी विजयावर परळीतील अभुतपूर्व सभेने केलं शिक्कामोर्तब!

## माझ्यावर वैद्यनाथाची सावली म्हणून उभे राहून तुम्हीच आशीर्वाद द्या !

- तुमचं प्रेम आहेच- लोकसभेला संधी द्या: जीवाचे रान करुन विकासरुपाने परतफेड करेन - पंकजाताई मुंडे
- जिल्ह्यातील विकासाचं जे केलय ते आम्हीच केलं आणि जे नाही झालं ते आम्हीच करणार आहोत!
- आजचा परळीतील मंच अस्वस्थता दूर करून शांती व समाधान देणारा



परळी ।प्रतिनिधी

बीड जिल्ह्याचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी लोकसभा निवडणुकीत मतदानरूपी आशीर्वाद देऊन आपले नेतृत्व करण्याची संधी मला आपण सर्वांनी द्यावी. यापूर्वी राज्यात मंत्रिमंडळात काम करत असताना जिल्ह्यातील गाव,वाडी, वस्ती तांडच्यापर्यंत विकासाची गंगा आपल्याला आणता आली. तुमचे आशीर्वाद माझे नेतृत्व घडवत आहे.मी विकास केला आहे हे जनता मान्य करते. ही निवडणूक विकासासाठी आहे, राज्याला आणि जिल्ह्याला एकच सरकार हवे आहे.. देशासाठी काम करायची संधी आहे.माझ्यावर तुमचं प्रेम आहेच. यावेळी लोकसभेला संधी द्या.जीवाचे रान करुन विकासरुपाने त्या प्रेमाची नक्कीच परतफेड करेन असा विश्वास पंकजाताई मुंडे यांनी दिला.

बीड लोकसभा मतदारसंघाच्या लोकप्रिय उमेदवार पंकजाताई मुंडे यांच्या प्रचाराची समारोप सभा परळीच्या मोंढा मैदानावर झाली.या अभुतपूर्व विराट जाहीर सभेला छत्रपती शिवाजी महाराज यांचे वंशज छत्रपती उदयनराजे भोसले, कृषीमंत्री ना.धनंजय मुंडे, रासपचे अध्यक्ष महादेव जानकर, माजी मंत्री संभाजी पाटील, किरण पाटील आदींसह मान्यवर उपस्थित होते. यावेळी तमाम परळिकरांच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांचे वंशज छत्रपती उदयनराजे भोसले यांचा ह्रदय सत्कार करण्यात आला.यावेळी बोलतांना पंकजाताई मुंडे यांनी सांगितले की, जो वंचित, उपेक्षित आहे, ज्याचा कोणी वाली नाही त्याची सेवा करण्यासाठी माझ्या पित्याने मला राजकारणात आणलं. मला पाच वर्षे मुंडे साहेबांनी मागितले होते मात्र त्यापुर्वीच त्यांचे निधन झाले.आता तुम्हीच वैद्यनाथाची सावली म्हणून माझे आहात. तुम्हीच माझी उर्जा आहात.तुम्हीच माझी या निवडणुकीत काळजी घ्या. तुमच्या सेवेसाठी मी काम करणार आहे हा विश्वास पंकजाताई मुंडे यांनी दिला.

जिल्ह्याचा सर्वांगीण विकास करायचा आहे

मला जिल्ह्याचा सर्वांगीण विकास करायचा आहे. जिल्ह्यातील जमीन ओलिताखाली आणायची आहे. शेतकरी ऊस तोड कामगारांचे जोवन उंचावण्यासाठी काम करायचं आहे, मोदीजी यांच्या नेतृत्वाखाली मला हे काम आगामी पाच वर्षात करायचे आहे. जिल्ह्यातील १० हजार तरुणांना जिल्ह्यात रोजगार उपलब्ध करून घ्यायचा आहे. जिल्ह्यात कॅन्सर रुग्णालय उभारायचे आहे.यासाठी ही निवडणूक असुन प्रचंड मताधिक्याची



मला अपेक्षा आहे असे पंकजाताई मुंडे यांनी सांगितले.आजचा मंच अस्वस्थता दूर करून शांती व समाधान देणारा

आजचा परळीतील मंच अस्वस्थता दूर करून शांती व समाधान देणारा आहे.पहिल्यांदा जेंव्हा मी निवडणूक लढली त्यावेळी स्व. गोपीनाथराव मुंडे, स्व. पंडितअण्णा मुंडे ,धनंजय मुंडे असा संपूर्ण परिवार या मंचावर होता.त्यानंतर जे घडले ते माझ्यासाठी अस्वस्थ करणारे होते.मी निवडणूक जिंकले,मंत्री झाले, अनेक कामे केली,राजकीय वाटचाल सुरु राहिली.धनंजय मुंडेही विरोधीपक्षनेते झाले,मंत्री झाले त्यांचीही राजकीय वाटचाल सुरु राहिली मात्र मनातील अस्वस्थता कमी झाली नाही.आज आम्ही एक आहोत.आमच्या पक्षांचीही युती झाली. त्यामुळे आजचा परळीतील मंच अस्वस्थता दूर





## बजरंग बप्पा सोनवणे यांचा विजय निश्चित - विजय साळवे

माजलगाव : प्रतिनिधी

धर्मांध शक्तींना रोखण्यासाठी स्वाभिमानी रिपब्लिकन सेनेचा बीड जिल्ह्यात बजरंग सोनवणे यांना बिनशर्त पाठिंबा दिल्या मुळे जिल्ह्यातील दलित समाजात जातीयवादी पक्षाच्या विरोधात जबरदस्त वातावरण निर्माण झालेले असुन गावा गावात जाऊन दारोदारी फिरून स्वाभिमानी नेते विजय साळवे यांनी बैठका घेवून खऱ्या अर्थाने देश वाचवायचा असेल तर राज्यघटना वाचवणं गरजेच आहे , आणि राज्यघटना वाचवायची असेल तर भाजपला हरवणे अत्यंत आवश्यक आहे. आणि म्हणून माजलगाव तालुक्यातील स्वाभिमानी भिमसैनीकांनी निश्चय केला आहे कि , जातीयवादी शक्तीला रोकण्यासाठी यंदा मताचे विभाजन न करता एकमताने बजरंग बप्पा सोनवणे यांना प्रचंड मताने विजयी करण्याचे निर्धार येथील कार्यकर्त्यांनी केला आहे.

हि निवडणूक संविधान वाचवण्यासाठीची व स्वाभिमानाची आहे, म्हणून जिल्ह्यातील गावा गावातील दलित समाजातील सुज्ञ व जानकार मतदारांनी स्वाभिमानी नेते विजय साळवे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून आपल्यातील होत असलेले मताचे विभाजन टाळुन यंदा बजरंग सोनवणे यांना प्रचंड मताधिक्याने विजयी करण्याचा निर्धार केला आहे.

स्वाभिमानी नेते विजय साळवे हे आपल्या समाज बांधवांना विश्वासात घेवून दिवस रात्र एक करून बजरंग सोनवणे यांचा विजय निश्चित हे एकच ध्येय डोळ्यासमोर ठेवून सोबतीला स्वाभिमी नेते पंडित ओव्हाळ , अंजेराम घनघाव, वशिष्ठ लांडगे, विशाल ससाने , भास्कर पौळ, विश्वनाथ तोडके , राजु मोरे , वैजनाथ गडसिंग, साहेबा टाकणखार , सय्यद अन्वर , राजेश टाकणखार , शेख मजहर , राजु किर्ते , राहूल मोरे , बाळु तुपारे , राजु सिरसट , महादेव मोरे , बालासाहेब भालेराव , रमेश पौळ , अशोक निकाळजे , गौतम सोनपसारे , बाबा पोटभरे , बबन चोपडे , बाबा गाडेकर , विलास खळगे , भिमा गायकवाड यांच्या सह इतरही उत्साही कार्यकर्ते प्रचार यंत्रणा राबवतांना सोबत दिसत आहेत.



## लिंबागणेश सर्कल मध्ये तुतारीच वाजणार

### सर्वसामान्य मतदार बजरंग बाप्पाच्या पाठीशी

लिंबागणेश । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील बालाघाटावरील लिंबागणेश सर्कल मधील सर्वसामान्य मतदार महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार बजरंग बप्पा सोनवणे यांच्या पाठीशी असल्याने तुतारीच वाजणार असल्याचे सर्वसामान्य मतदारातुन बोलले जात असुन बजरंग बप्पा यांनी बालाघाटावरील लिंबागणेश सर्कल मधील लिंबागणेश, मोरगाव,मुळुक,मसेवाडी , पोखरी,पिंपरनई,सोमनाथवाडी,बेलगाव आदि.गावांमध्ये ग्रामस्थांच्या भेटीगाठी घेतल्याने या भागातुन त्यांना मोठ्या प्रमाणावर मताधिक्य देण्याचे आश्वासन ग्रामस्थांनी दिले आहे.याचवेळी प्रमुख विरोधी असणा-या भाजपा उमेदवारांच्या गाठीभेटी न झाल्याने त्यांचा प्रचार फिका पडल्याचे दिसून येत आहे.लिंबागणेश सर्कलमध्ये शिवशक्ती -भिमशक्ती विचारमंचचे प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब मोरे पाटील यांनी माजी मंत्री सुरेश नवले यांच्या सोबत बालाघाटा वरील लिंबागणेश,चौसाळा, अंजनवती ,बोरखेड आदि गावांमध्ये कॉर्नर सभा घेत शेतकरी पुत्र बजरंग बप्पा यांना मोठ्या संख्येने मताधिक्य देत लोकसभेत पाठविण्याचे आवाहन केले असुन सभांना ग्रामस्थांनी मोठा प्रतिसाद दिला आहे.

मराठा समाजाला कुणबी प्रवर्गातुन आरक्षण मिळावे यासाठी लिंबागणेश सर्कल मधील साखळी उपोषणाचे लिंबागणेश केंद्रबिंदू होते.बजरंग बप्पा यांनी जाहिर रित्या जेव्हा मी खासदार म्हणून निवडून जाईल तेव्हा संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांची मराठा समाजाची जी मागणी असेल तीच मागणी मी दिल्लीच्या सभागृहात मांडेल असा शब्द दिल्यामुळे लिंबागणेश सर्कल मधील बहुतांश मराठा समाजाने बजरंग बप्पा यांच्या पाठीशी उभा राहील्याचे दिसुन येत आहे.भाजपाचे उमेदवार पंकजाताई मुंडे यांच्या प्रचाराबाबत सर्कलमध्ये उदासीनता दिसून आली .

## गेवराई शहरातील राष्ट्रीय महामार्गावर बेकायदेशीर महामंडळाचे इलेक्ट्रीक पोल उभारणी तात्काळ बंद

गेवराई / प्रतिनिधी

गेवराई शहरात वाहातुकीचा मुख्य रस्ता असलेला शंभर फुटी राष्ट्रीय महामार्गावर एस टी महामंडळाचे लाईट चे पोल उभे करण्याचे काम सुरू असून हे पोल मुख्य रस्त्यावर शंभर फुटांच्या आत बेकायदेशीर लावले जात आहेत. सदरील रस्त्याचे विकास कामे, रुंदीकरण, डिव्हायडर चौक सुशोभीकरण शासनाकडे प्रस्तावित असून, या पोल मुळे या मार्गावर अपघातात वाढ होत असून जनतेच्या जिवाला धोका उत्पन्न करणारे तसेच शहराच्या विकासासाठी अडचण ठरणार आहे.

तरी सदरील पोल उभारणी चे काम तात्काळ बंद करण्यात यावं अन्यथा आपल्या गेवराई तहसील कार्यालय समोर दि २० मे २०२४ सोमवार पासून आमरण करण्यात येणार आहे, या निवेदनाच्या प्रती १) उपविभागीय अभियंता सा. बा. गेवराई , २) डढ विभाग नियंत्रक साहेब (ऊ्ऊ) बीड, ३) प्रशासक साहेब नगर परिषद गेवराई यांना सादर करण्यात आल्या आहेत. या निवेदनावर राष्ट्रीय छावा संघटनेचे प्रदेश संघटक तथा छत्रपती शिवाजी महाराज स्मारक



समितीचे उपाध्यक्ष शामराव गायकवाड (पाटील), तालुकाध्यक्ष बाबुराव गवारे, ता. सचिव तथा स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे गेवराई तालुकाध्यक्ष विलासराव खिसाडे, ज्येष्ठ मार्गदर्शक शिवश्री सखाराम जी कानगुडे, तालुका उपाध्यक्ष संजय सगळे (पाटील), भागवत जगताप, गणेश निकम, अक्षय हादघुले, रामदास ढोबळे, अशोक जंगले, बाळासाहेब मोटे, महादेव कानगुडे यांच्यासह गेवराई शहरातील सुजाण नागरिक उपस्थित होते.

## धारुर येथील संभाजीनगर झोपडपट्टी भागात असलेला बीएसएनएल टॉवर शनिवारी कोसळला



धारुर । प्रतिनिधी

सायंकाळी ५ च्या सुमारास वादळी वाऱ्यामुळे झालेल्या या घटनेत एकाच कुटूंबातील तीन बालिकांसह दोघे जण गंभीर जखमी झाले आहेत. यासोबतच शहरातील विद्युत खांबावर बाभळी कोसळल्याने मोठे नुकसान झाले आहे.शनिवारी अचानक झालेल्या वादळी पावसामुळे सदर टॉवर जमीनदोस्त झाला असून, टॉवरचा काही भाग राहत्या घरावर पडल्यामुळे एकाच कुटूंबातील पाच जण गंभीर जखमी झाले आहेत. या अपघातात राधा कौर (वय ८), पुनम कौर (वय ६), दस्मित कौर (वय ५), गंगा कौर (वय २२) योगिंदर सिंग (वय २५) अशी जखमींची नावे आहेत. या घटनेनंतर जखमींना ग्रामीण रुग्णालयात प्राथमिक उपचारासाठी पाठवण्यात आले. यानंतर पुढील उपचारासाठी त्यांना अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

तीस वर्षापूर्वी बीएसएनएलकडून एसटीडी सेवेसाठी टॉवर उभारण्यात आले होते. सद्य स्थितीत हा टॉवर बंद अवस्थेत होता. काही दिवसांपुर्वी या टॉवरचा एक भाग कोसळला होता. याबाबत प्रसार माध्यमातून अनेक वेळा वृत्त प्रसारितकरुन दुरसंचार विभागाला कळवण्यात आले होते. याभागात शिकलकरी समाजाची घरे असून त्यांना धोका असल्याचे निदर्शनास आणून दिले होते. मात्र या टॉवरकडे बीएसएनएल विभागाचे दुर्लक्ष केले होते. दरम्यान शहर परिसरात वादळी वाऱ्यामुळे अनेक झाडे देखील उनमळून पडली आहेत.

## गेवराई तालुक्यात पुजा मोरे होणार बजरंग बप्पांसाठी किंगमेकर

तलवाडा । प्रतिनिधी

मराठा क्रांती मोर्चातून घडलेलं नेतृत्व, उच्चविद्याविभूषित,माजी पंचायत समिती सदस्या कु. पुजा ताई मोरे यांनी राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अधिकृत उमेदवार बजरंग बप्पा सोनवणे यांच्या विजयासाठी अक्षरशः गेवराई विधानसभा मतदारसंघ पिंजून काढला. मुळातच कु. पुजा ताई मोरे यांची जनसामान्यांशी नाळ



कायमच जोडलेली. शेतकरी, कष्टकरी कुटुंबांच्या प्रश्नांवर सतत आवाज उठवतात. मध्यंतरी शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर आवाज उठवण्यासाठी राजू शेट्टी यांच्या स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे काही दिवस काम केले. शेतकऱ्यांच्या, कष्टकऱ्यांच्या खऱ्या प्रश्नांची जाण त्यांना होती म्हणून; स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या प्रदेशाध्यक्षा म्हणूनही त्यांनी काम पाहिले. आता कु. पुजा ताई मोरे यांनी शरदचंद्र पवार साहेब यांच्या उपस्थितीमध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षामध्ये प्रवेश केला. त्यांची शेतकरी, कष्टकरी व महिलांच्या प्रतीची तळमळ पाहता पक्षाने पहिल्यांदाच एका युवतीला किसान सेलच्या प्रदेशाध्यक्षापदी नियुक्ती केली असून; ही बाब बीड जिल्ह्यासाठी भुषवाह आहे. बीड जिल्ह्यात खूप साऱ्या पक्षाने प्रदेशाध्यक्ष पदे भूषविले आहेत. त्यामधे कु. पुजा ताई मोरे यांचाही नवयुवतीचा एक समावेश होतो. गेवराई विधानसभा मतदार संघात त्यांची शेतकरी, वृद्ध, कष्टकरी,युवा, महिलांसोबत जोडलेली नाळ बजरंग सोनवणे यांना येणाऱ्या १३ तारखेच्या निवडणुकीत आशीर्वादरुपी मतदानाने नक्कीच होणार असून; पुजा ताई मोरे गेवराई विधानसभा मतदारसंघात बजरंग बप्पा सोनवणे यांच्यासाठी किंगमेकर ठरतील.

## बौद्ध धर्माच्या इतिहासावर एक दिवसीय कार्यशाळा संपन्न

बीड । प्रतिनिधी

ज्ञानसागर बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या वतीने दिनांक १० मे २०२४ रोजी बीड येथे एक दिवसीय बौद्ध धर्माच्या इतिहासावरती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. आयोजित कार्यशाळेस भंतेजी महेशजी थेरो, धम्मानंद थेरो, विजय थेरो, सिद्धांत थेरो इत्यादी प्रमुख भंतेजींची उपस्थिती होती. कार्यशाळेत उपस्थित सर्व उपासक उपासिका यांना मार्गदर्शन करताना भंतेजी सिद्धांत थेरो म्हणाले की, बौद्ध धर्माची सुरुवात भारतात सिद्धार्थ गौतमाने केली असे मानले जाते. सिद्धार्थचा जन्म झाला इ.स.पू. पाचव्या शतकाच्या आसपास दक्षिण नेपाळमधील एका कुळातील आदिवासी प्रमुखाला. त्यानुसार बौद्ध साहित्यात तो घरी राहिला तर राजा होईल असे भाकीत केले होते किंवा महान ऋषी आणि मानवतेचा तारणहार जर तो सोडला. सिद्धार्थच्या वडिलांना आपल्या मुलाने सोडून जावे असे वाटत नव्हते. आपल्या मुलाने राजा व्हावे आणि त्याच्या पावलावर पाऊल टाकावे अशी त्यांची इच्छा होती. कथा पुढे जात असताना, सिद्धार्थ श्रीमंती आणि ऐषो आरामांनी वेढलेला मोठा झाला. त्याला फक्त सुखच माहीत होते. राजवाडे आणि त्याच्या वडिलांनी कोणत्याही वेदना किंवा कुरूपतेपासून संरक्षण केले. जेणेकरून ते तसे करणार नाहीत मानवी दुःखाचा अनुभव घ्या. पण सिद्धार्थ त्याच्या चैनीच्या जीवनाने अस्वस्थ झाला. तो जीवनात आणखी काय आहे याचा विचार केला आणि बाहेरचे जग पाहण्याची मागणी केली. त्याच्या वडिलांनी होकार दिला. त्याच्या मागणीनुसार आणि त्याला बाहेरचे जग पाहण्याची परवानगी दिली, तरीही त्याने त्याचे अनुभव मर्यादित करण्याचा प्रयत्न केला इतरांसह तरुण आणि निरोगी लोकांसाठी. तसे झाले नाही.



कथेनुसार, बाहेरच्या जगात त्याच्या प्रवासादरम्यान सिद्धार्थला चार जण भेटले प्रेक्षणीय स्थळे ज्याने त्याच्यावर कायमची छाप सोडली. (१) त्याने कधीही वृद्ध आणि जीर्ण लोक पाहिले नव्हते त्याआधी, जेव्हा तो एका वृद्ध माणसाला भेटला तेव्हा त्याला धक्का बसला. जेव्हा तो शोधण्याचा प्रयत्न करत होता वृद्ध पुरुषांबद्दल अधिक, तो एका अतिशय आजारी व्यक्तीवर अडखळला. हे त्याच्यापेक्षा जास्त धक्कादायक होते. यापूर्वी कधीही माहित नाही किंवा आजार पाहिलेला नाही. मग त्याने नदीच्या कडेला अंत्यसंस्कार करताना पाहिले. यातही त्याच्यासाठी नवीन आणि सर्वात धक्कादायक होता. शेवटी, त्याची एका प्रवासी साधूशी भेट झाली. देहाच्या सर्व सुखांचा त्याग केला होता. त्याचा चेहरा इतका निर्मळ होता की प्रतिमा मनातच राहिली सिद्धार्थ बराच वेळ विचार करत होता. सिद्धार्थला काही साधी सत्ये शिकायला मिळाली होती, ज्यापासून तो बचावला होता: आपण सर्व आजारी पडतो, वृद्ध होतो आणि मरतो. त्याने मागील जीवनाचा त्याग करून स्वतःला समर्पित करण्याचा निर्णय घेतला दुःख संपवण्याचा मार्ग शोधणे. त्याची सुरुवातीची पद्धत प्रवासी साधूचे अनुकरण करणे, नकार देणे ही होती. सर्व सुख, आणि अत्यंत तपस्वी जीवनाचे अनुसरण करा. पण या अवस्थेत त्याचा मृत्यू जवळपास झाला. त्याला कशाने वाचवले ते म्हणजे एके दिवशी त्याने संगीताच्या तारांबद्दल कोणीतरी बोलताना ऐकले इन्स्ट्रुमेंट: जर स्ट्रिंग खूप घट्ट असेल तर ती तुटेल आणि खराब होईल; जर ते खूप सैल असेल तर तुम्ही बनवू शकत नाही. सुंदर संगीत. सिद्धार्थने हे स्वतःच्या अस्तित्वासाठी लागू केले आणि त्याची कल्पना तयार केली मध्यम मार्ग: भौतिक शरीर पूर्णपणे नाकारू नका आणि तरीही शरीराचे लाड करण्यासाठी जीवन जगू नका. प्रत्येक लहर यावर सिद्धार्थने काही काळ ध्यान केले आणि शेवटी तो आला ज्ञानाच्या संकल्पनेची समज. यानंतर, ते बुद्ध म्हणून ओळखले जाऊ लागले प्रबुद्ध. अखेरीस, त्याने आपले तत्वज्ञान शिकवण्यास सुरुवात केली आणि मोठ्या प्रमाणात अनुयायी मिळवले. आत्मत्याग, शिस्त आणि ध्यान या जीवनातून गेल्यावर तो प्राप्त झाला असे म्हणतात ज्ञानप्राप्ती ज्यामुळे त्याच्या वेदना आणि वेदना कमी झाल्या. त्यानंतर तो निघाला इतरांना जीवन आणि मृत्यूच्या चक्रातून मुक्त करणारा मार्ग शिकवण्याचा प्रवास. हळूहळू बौद्ध धर्माचा प्रसार अनेक देशांमध्ये झाला. मूळ भारतीय पाया होता मध्य आशियाई, पूर्व आशियाई आणि आग्नेय आशियाई संस्कृतींचा समावेश करून विस्तार केला. आज बौद्ध धर्माची लोकसंख्या असलेल्या जगातील जवळपास सर्व देशांमध्ये बौद्ध धर्माचा प्रसार झाला आहे अंदाजे ५०० दशलक्ष आहे. सर्वात जास्त लोकसंख्या चीनमध्ये आहे, तर थायलंड, कंबोडिया आणि म्यानमारमध्ये त्यांच्या लोकसंख्येमध्ये बौद्धांचे सर्वाधिक प्रमाण आहे. आयोजित कार्यशाळा यशस्वीतेसाठी संस्थेचे अध्यक्ष विजय विद्यागर संस्थेचे प्रतिनिधी विशाल देशमुख, मोहन घोडके, सय्यद अकबर, संदीप चौधरी, शेख ताहेर, जयराम अवंतकर, शेख मुबीन इत्यादींनी परिश्रम घेतले.

# शिवसैनिकांनी महायुतीचा धर्म पाळून पंकजा मुंडे यांना भरगच्च मतांनी निवडून आणावे–जगताप,मुळूक

## लोकसभा निवडणुकीसंदर्भात शिवसेनेची जिल्हा बैठक संपन्न

बीड (प्रतिनीधी)

महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष मुख्यमंत्री तथा शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथजी शिंदे साहेब तथा लोकप्रिय खासदार मा. डॉ श्रीकांत शिंदे साहेब यांच्या आदेशानुसार आणि सचिव संजय मोरे व उपनेते अर्जुन खोतकर, संपर्कप्रमुख विजय पाटील व विधानसभा संपर्कप्रमुख बापूसाहेब मोरे यांच्या सूचनेवरून बीड लोकसभा महायुतीच्या उमेदवार पंकजाताई गोपीनाथराव मुंडे यांना आपल्याला विक्रमी मताधिक्याने निवडून आणायचे आहे. पक्षाचा आणि पक्षप्रामुखाचा आदेश शिरसंवाद असतो. बाळासाहेबांचे संस्कार आपल्यावर आहेत त्यामुळे आदेश पाळणारे आणि महायुतीचा धर्म जपणारे आपण शिवसैनिक आहोत. छोटीमोठी नाराजी बाजूला सारून महायुतीचा धर्म पाळून शिंदे साहेबांच्या आदेशाचे पालन करा आणि बीड लोकसभा महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांना विक्रमी मताधिक्याने निवडून आणा असे आवाहन शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप आणि सचिनभैय्या मुळूक यांनी आपल्या शिवसैनिकांना केले.

बीड लोकसभा निवडणुक २०२४ महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारार्थ शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, सचिनभैय्या मुळूक यांच्या अध्यक्षतेखाली बीड जिल्हा शिवसेनेची काल शनिवारी दि.११ रोजी दु. १.०० वाजताच्या दरम्यान बीड शहरातील बार्शी रोडवरील हॉटेल ग्रॅड यशोदा येथे बैठक संपन्न झाली. या बैठकीमध्ये येत्या दोन दिवसात जीवाचे रान करुन महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांना विजयी करण्याचा निश्चय शिवसैनिकांनी घेतला आहे.

याप्रसंगी शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी आपल्या पदाधिकारी यांच्याशी संवाद साधला. ते म्हणाले की, पक्षाचा आणि शिंदे साहेबांच आदेश शिरसंवाद आहे. त्यामुळे महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांना निवडून द्यायचं आहे. आदेशाचं पालन करणारा शिवसैनिक आहे हा आजावरचा इतिहास आहे. पंकजाताई मुंडे यांना भरगच्च मतांनी विजयी करून लोकनेते स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे यांना शिवसैनिकांडून श्रद्धांजली अर्पण करायची आहे. पंकजाताई यांना भरगच्च मतांनी निवडून आणून आपल्या पक्षाच्या आदेशाचे पालन करायचे आहे पण याबरोबरच लोकसभा निवडणुकीच्या निकालादीवशीच सन्मानीय अनिलदादा यांचा वाढदिवस आहे त्यामुळे यंदाचा अनिलदादांचा वाढदिवस आपल्याला विजयी गुलाल उधळून साजरा करायचा आहे. पंकजाताई मुंडे यांना निवडून आणण्याचा निश्चिय करा आणि येत्या दोन दिवसात आपली सर्व यंत्रणा कामाला लावा असे आवाहन सचिन भैय्या मुळूक यांनी केले. यादरम्यान शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांनी सांगितले की, शिंदे साहेबांनी सांगितले की, युतीचा धर्म तुटला नाही पाहिजे. कुठली उणीव जर मित्र पक्षाकडून आपल्याला भासली असेल तर येणाऱ्या काळात ती उणीव मी







भरून काढेल. युतीचा धर्म पाळण्यासाठी शिंदे साहेब रात्रंदिवस पळतायत. जर आपला नेता युतीचा धर्म पाळण्यासाठी अहोरात्र पळत असेल तर आपण देखील एक शिवसैनिक म्हणून आपल्या नेत्यासाठी महायुतीच्या उमेदवार पंकजाताई यांना निवडून आणायसाठी प्रयत्न करावेत.स्वर्गवासी गोपीनाथ मुंडे साहेबांचे केंद्रात मंत्री होऊन बीड जिल्हाचा सर्वांगीण विकास करण्याचे स्वप्न साकार करण्यासाठी सर्व पदाधिकारी शिवसैनिकांनी येणाऱ्या दोन दिवसात पूर्ण ताकदीने पंकजाताई यांना निवडून देण्यासाठी आपलं योगदान द्यायचं आहे. बीडच्या शिवसैनिकांनी काम केले नाही अशी तक्रार शिंदे साहेबांकडे जाऊ नये असे काम शिवसैनिकांनी केले पाहिजे. मुख्यमंत्री शिंदे साहेबांकडे कुणी बोट दाखवू नये यासाठी आपल्याला ताकदीने लढायचंय. सर्वांना दाखवून देयायचं शिंदे साहेब यांचे बीडचे शिवसैनिक काय करू शकतात.येणाऱ्या दोन दिवसात नाराजी सोडून युतीचा धर्म आणि शिंदे साहेबाचा आदेश म्हणून पूर्ण ताकदीने पंकजाताई यांना निवडुन आणा अशी विनंती दोन्ही जिल्हाप्रमुख यांच्या वतीने अनिलदादा जगताप यांनी केली.

# पंकजाताईंना मत म्हणजे बीड जिल्ह्याच्या शाश्वत विकासाला मत - अक्षय बाळासाहेब बांगर

**पाटोदा (प्रतिनिधी) : बीड लोकसभेची निवडणूक अंतिम टप्प्यात आलेली आहे. त्यामुळे आता राजकीय वातावरण चांगलेच तापले असून बीड जिल्ह्याचा सर्वांगीण विकास करण्याची ताकद महायुतीच्या बीड लोकसभेच्या उमेदवार पंकजाताई गोपीनाथराव मुंडे यांच्यामध्ये आहे. आशा विकासाभिमुख नेतृत्वाला संधी देऊन बीड जिल्ह्याच्या शाश्वत विकासासाठी आपले मत कमळ चिन्हाला देऊन पंकजाताई मुंडे यांना सर्वाधिक मताधिक्याने संसदेत पाठवा असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी सोशल मीडिया तालुकाध्यक्ष अक्षय बाळासाहेब बांगर यांनी केले आहे.**

बीड लोकसभा निवडणुकीमध्ये दिवंगत लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब यांची कन्या पंकजाताई उभ्या आहेत. देशाचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या नेतृत्वाखाली बीड जिल्ह्याचा पंकजाताईच्या माध्यमातून विकास होईल तसेच जिल्ह्याचे पालकमंत्री तथा कृषी मंत्री नामदार धनंजय मुंडे यांच्या माध्यमातून बीड जिल्ह्याचा विकास झाला त्यामुळे हा विकास अविरतपणे सुरू ठेवण्यासाठी बीडच्या सुज्ञ मतदारांनी येत्या १३ तारखेला कमळासमोरील बटन दाबून महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांना संसदेत पाठवावे.



महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांच्या माध्यमातूनच बीड जिल्ह्याचा शाश्वत विकास होऊ शकतो. पंकजाताईंना मत म्हणजे बीड जिल्ह्याच्या शाश्वत विकासासाठी मत असुन महायुतीच्या उमेदवार मा. पंकजाताई गोपीनाथराव मुंढे यांनाच येणाऱ्या १३ तारखेला मशीन वरील एक नंबर चे बटण दाबून कमळ या चिन्हाला मतदान करून मोठ्या मताधिक्याने निवडून द्यावे असे आवाहन येथील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी सोशल मीडिया तालुकाध्यक्ष अक्षय बाळासाहेब बांगर यांनी केले आहे.

# गेवराई तालुक्यात बजरंग बप्पा सोनवणे यांच्या विजयासाठी बदाम सैनिक एकवटले

## गेवराईत बजरंग सोनवणे यांच्या प्रचारार्थ झालेली जयंत पाटील यांची सभा लीड देणारी ठरणार!

**गेवराई । प्रतिनिधी महाविकास आघाडीचे उमेदवार शेतकरी पुत्र बजरंग सोनवणे यांना मोठ्या मताधिक्याने निवडून आणण्यासाठी माजी मंत्री बदामराव पंडित यांनी गेवराई तालुक्यातील गावोगावी भेटी दिल्या असल्याने बदामराव पंडित समर्थक मोठ्या उत्साहाने कामाला लागले आहे. बजरंग बप्पा ला लोकसभेच्या सभागृहात पाठवण्यासाठी ग्रामीण भागात मतदार यांना भेटून डोअर टू डोअर प्रचार सुरू असून यामध्ये बदाम श्रेणी एकजुटीने कामाला लागल्याचे चित्र असून ज्यांना स्टार प्रचारक म्हणून जबाबदारी दिली त्यांना एकटे फिरण्याची वेळ आल्याने तालुक्यात त्यांची हवा गुळ झाल्याची परिस्थिती आहे.**

परंतु बदाम आबाची ताकद तालुक्यात एकवटली असल्याने तुतारी वाजणार अशी चर्चा तालुक्यात ग्रामीण भागात दिसून येते. महाराष्ट्रात राजकीय उलथापालथ झाल्यावर कोण कोणत्या पक्षात जाऊन आपले अस्तित्व सिद्ध करेल, हे या लोकसभा निवडणुकीच्या निकालावर अवलंबून राहणार आहे. गेवराई ते महाविकास आघाडीचे लोकसभेचे

उमेदवार बजरंग सोनवणे यांच्या प्रचारार्थ राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शरद पवार गटाचे जयंत पाटील यांची सभा झाली ही सभा बजरंग सोनवणे यांना तालुक्यातून लीड देणारी ठरणार असून बदामराव पंडित यांच्या विधानसभेचे सूतोवाच



ठरवणारी आहे. मतदारांच्या गाठीभेटी घेऊन डोअर टू डोअर त्यांनी तुतारी पोहोचवली. असल्याने बजरंग सोनवणे यांना गोदापट्ट्यात मोठे मताधिक्य मिळणार यात शंका नाही. बदाम आबा आहे उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचे असून तालुक्यात शरद पवार यांच्या



राष्ट्रवादी पक्षाला खंबीर नेतृत्व नसल्याने कुठेच प्रचारात आघाडी नाही. स्टार प्रचारक म्हणून नियुक्ती केलेल्या नेत्यांनी जैन पाटील यांच्या सभेला किती जनसमुदाय जमा केला होता हाच प्रश्न? नेत्यांना पडला आहे

## ■ तुम्हाला माझ्या गळ्याची अन् छत्रपती शिवरायांची शपथ आहे, पंकजाताईंना विक्रमी मताधिक्य देऊन विजयी करा

# छत्रपतींचा आशीर्वाद ; बहिणीच्या प्रचारासाठी उदयनराजे भोसले खास साताऱ्याहून आले जिल्ह्यात

कडा (आष्टी) ।प्रतिनिधी

छत्रपती शिवाजी महाराज यांचे वंशज छत्रपती उदयनराजे भोसले खास साताऱ्याहून बहिणीच्या म्हणजेच पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारासाठी आज जिल्हयात आले होते. पंकजाताई तुमची मुलगी, बहीण, आहे. तिला मतदान करायचे नाही तर कोणाला करायचे? माझी भगिनी पंकजाताई मुंडेला आता संधी मिळाली आहे, तिला येत्या १३ तारखेला भरघोस मतदान करून विजयी करा. स्थिर सरकार सत्तेवर असते त्यावेळीच आपल्या भागाचा विकास होत असतो. तुम्ही सर्वजण सज्ञान आहात,तुम्हाला मताचा अधिकार आहे त्यामुळे कृपा करून माझ्या भगिनी पंकजाताईला निवडून द्या, अन्यथा मी राजीनामा देतो आणि पंकजाताईला तिकडून निवडून आणतो असे सांगत छत्रपती उदयनराजे महाराज भोसलेंनी कडा येथील जाहीर सभेत मतदारांना पंकजाताईला निवडून देण्याचे आवाहन करत भावनिक साद घातली. तर सर्व समाजाला सोबत घेऊन चालणारा नेते म्हणजे गोपीनाथ मुंडे होते.मराठवाड्याचे ते दैवत होते. जनतेच्या न्याय हक्कासाठी पंकजाताई मुंडे या कायम भूमिका घेऊन लढत असतात.पंकजाताई गोपीनाथ मुंडे साहेबांचा संघर्षाचा आणि विचारांचा वसा घेऊन वाटचाल करत आहेत.



### ■ उदयनराजे भोसलेंनी उडवली कॉलर

सभेतील भाषणादरम्यान उदयनराजे महाराज भोसले यांनी आपल्या स्टाईल मध्ये कॉलर उडवून ही प्रचार सभा नाही तर विजयी सभा आहे, असा विश्वास व्यक्त करताना उपस्थित त्यांना तुम्हाला वाकून नमस्कार करतो परंतु माझी भगिनी पंकजाताई मुंडेला प्रचंड मतांनी विजयी करा असे आवाहन त्यांनी याप्रसंगी केले.

### पंकजाताईंचे कर्तृत्व पाहून त्यांना विजयी करा– ना. धनंजय मुंडे

जिल्ह्यातील जनतेने आजपर्यंत कधीही जात-पात अथवा धर्म पाहून नव्हे तर व्यक्तीच्या कर्तृत्वला पाहून मतदान करत विजयी करून दिले आहे. म्हणून बीड जिल्ह्याच्या विकासासाठी पालकमंत्री असताना योगदान देणाऱ्या पंकजाताईंचे कर्तृत्व पाहून त्यांना लोकसभा निवडणुकीत प्रचंड मतांनी विजयी करा असे आवाहन राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी केले.





### क्षणचित्रे

■ अलोट जनसागराच्या साक्षीने कडा येथील सभेत उदयनराजेंचे मतदारांना आवाहन

■ बीडच्या विकासासाठी पंकजाताई केंद्रात जाणं आवश्यक ; त्यांना प्रचंड मतांनी निवडून द्या

■ उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिला मतदारांना विश्वास


हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT